जा.क्र.मार्गदर्शकसूचना/2015/सहसंनर/परिपत्रक/132
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे-1
दि.09/02/2015.

**विषय :- मूल्यांकनासाठी असलेल्या मार्गदर्शक सूचना क्र.17 नुसार रस्त्याच्या स्वतंत्र मूल्य विभागाच्या अंतर्गत भागातील भूखंड/ जमिनीच्या मूल्यांकनाबाबत.**

**परिपत्रक :-**

उर्वरित महाराष्ट्रासाठी असलेल्या मार्गदर्शक सूचनामध्ये रस्त्यासाठी स्वतंत्र मूल्य विभाग असलेल्या मूल्य विभागातील सदर रस्त्यापासून 50 मी. पेक्षा जास्त अंतरावर असलेल्या भूखंडाचे/ विस्ताराने मोठ्या असलेल्या अंतर्गत भागात स्थित असलेल्या जमिनीचे मूल्य रस्त्यावरील मूल्य दराच्या 70% दर विचारात घेऊन ठरविणेत यावा असे नमूद आहे.

सदर सूचना सन 2013 पासून अंमलात आहे. सन 2011-13 च्या स्थानिक तपासणी अहवालामध्ये एका अभिनिर्णय प्रकरणी रस्त्याकरिता असलेल्या स्वतंत्र मूल्य विभागातील दर व रस्त्याच्या अंतर्गत स्थित असलेल्या जमिनीसाठीच्या मूल्य विभागातील दर यामधील दराच्या 70% पेक्षा जास्त फरक असलेचे निदर्शनास आले आहे. वास्तविक सदर सूचना व अंतर्गत मूल्य विभागाचा दर यापैकी जास्तीचा दर विचारात घेणे आवश्यक आहे. त्यामुळे मार्गदर्शक सूचना क्र.17 मध्ये त्या अनुषंगाने सुधारणा करणे आवश्यक झाले आहे.

मार्गदर्शक सूचना क्र.17 मधील पहिल्या वाक्यामध्ये "70%" दर यानंतर "अथवा अशा रस्त्याच्या अंतर्गत स्थित जमिनीसाठी असलेल्या मूल्य विभागातील दर या दोन्ही पैकी जास्तीचा दर" असे समाविष्ट करण्यात येत आहे.

सदर परिपत्रकाची प्रत नोंदणी व मुद्रांक विभागाच्या www.igrmaharshtra.gov.in या संकेतस्थळावर publication या सदराखाली circulars या ठिकाणी उपलब्ध आहे.

सही/-
( श्रीकर परदेशी )
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहितीसाठी सादर :-

1) मा.सचिव, (मदत व पुनर्वसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-32.
2) मा.महालेखाकार (लेखापरिक्षा) - II, महाराष्ट्र, नागपूर.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :-

3) सहनोंदणी महानिरीक्षक, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
4) उपसंचालक, नगर रचना, मुंबई प्रदेश मूल्यांकन मुंबई.
5) सहायक संचालक, नगर रचना,मूल्यांकन, कोकण/ पुणे/नाशिक/ औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

6) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक (मुख्यालय), पुणे.

7) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक (संगणक), पुणे.

सदर परिपत्रकाची प्रत विभागाच्या संकेतस्थळावर Upload करणेबाबतची कार्यवाही करणेत यावी.

8) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, मुंबई / कोकण / पुणे/नाशिक/ औरंगाबाद / लातूर / अमरावती / नागपूर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

-/ सदर परिपत्रकाची प्रत आपले अधिनस्त सर्व नोंदणी कार्यालयांना पुरविणेत यावी. तसेच सदर परिपत्रक त्यांना प्राप्त झाले असून, ते वाचलेबाबत (Read & Acknowledge) त्यांच्या कार्यालयाचा अहवाल प्राप्त करुन घेऊन या कार्यालयास पाठविणेत यावा.

9) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय,पुणे.

निर्गमित

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता

F:\Technical\ASR 2015\paripatrake\Circular-201114\circular